| | |
|---|---|
| विषय क्र. ०१.<br>दि.०४ ऑगस्ट, २०२२. | नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रा मध्ये राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत डास अळीनाशक फवारणी व रासायनिक धुरीकरणाची गटनिहाय (नागरी आरोग्य केंद्र निहाय) कामांच्या कंत्राटास मुदतवाढ देण्यास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेस सादर, आयुक्तांचे दिनांक ०४/०८/२०२२, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/आरोग्य/८१३६/२०२२. |
| ठराव क्रमांक<br>२६३४ | "उपरोक्त संदर्भात नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रा मध्ये राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत डास अळीनाशक फवारणी व रासायनिक धुरीकरणाची गटनिहाय (नागरी आरोग्य केंद्र निहाय) कामांच्या कंत्राटास मुदतवाढ देण्यास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेस सादर, प्रस्तावित केल्याप्रमाणे डासअळीनाशक फवारणी व रासायनिक धुरीकरण कामे कंत्राटी पध्दतीवर नागरी आरोग्य केंद्रनिहाय एकूण २३ गटांमध्ये करण्याच्या कंत्राटांस दिनांक ०१/०५/२०२२ ते ३०/०९/२०२२ या वाढीव कालावधीकरीता मुदतवाढ देण्यास व त्यासाठी एकूण रक्कम रु.४,९९,७९,०११.००/- (अक्षरी रक्कम रुपये चार कोटी नव्याण्णव लक्ष एकोणऐंशी हजार अकरा मात्र) इतक्या खर्चास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह मा.आयुक्त तथा मा.प्रशासक यांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात यावी.” |
| निर्णय : | ठराव करण्यात येतो की,<br>नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रा मध्ये राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत डास अळीनाशक फवारणी व रासायनिक धुरीकरणाची गटनिहाय (नागरी आरोग्य केंद्र निहाय) कामांच्या कंत्राटास मुदतवाढ देण्यास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेस सादर, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ०१ ठराव क्रमांक २६३४ अन्वये, प्रस्तावित केल्याप्रमाणे डासअळीनाशक फवारणी व रासायनिक धुरीकरण कामे कंत्राटी पध्दतीवर नागरी आरोग्य केंद्रनिहाय एकूण २३ गटांमध्ये करण्याच्या कंत्राटांस दिनांक ०१/०५/२०२२ ते ३०/०९/२०२२ या वाढीव कालावधीकरीता मुदतवाढ देण्यास व त्यासाठी एकूण रक्कम रु.४,९९,७९,०११.००/- (अक्षरी रक्कम रुपये चार कोटी नव्याण्णव लक्ष एकोणऐंशी हजार अकरा मात्र) इतक्या खर्चास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह मा.आयुक्त तथा मा.प्रशासक यांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. |

सही/-
(चित्रा बाविस्कर)
नगरसचिव
नवी मुंबई महानगरपालिका

सही/-
(अभिजीत बांगर)
आयुक्त तथा प्रशासक
नवी मुंबई महानगरपालिका

| | |
|---|---|
| विषय क्र. ०२. दि.०४ ऑगस्ट, २०२२. | कोविड-१९ या महामारीच्या स्थितीमुळे केंद्र व राज्य शासनाकडून लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीच्या कालावधीत सार्वजनिक/सामुदायिक शौचालयांच्या (CT/PT) ०५ वर्षाच्या ठेका कालावधीमध्ये बाह्य भिंतींची सुबक रंगरंगोटी करणे, शौचालयांचे भींतींवर लावण्यात येणाऱ्या जाहिरात माध्यमांचा तसेच त्यासभोवतीच्या परिसराचे सुशोभिकरण करणे, देखभाल व निगा राखणे व त्यापोटी सार्वजनिक /सामुदायिक शौचालयांच्या (CT/PT) भिंतींवर जाहिरात करणेबाबतच्या ठेक्यांतर्गत ठेका कालावधी वाढवून देण्याबाबत प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत, आयुक्तांचे दिनांक ०४/०८/२०२२, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/परवाना विभाग/जाहिरात माध्यमे/५३१/२०२२. |
| ठराव क्रमांक २६३५ | "उपरोक्त संदर्भात कोविड-१९ या महामारीच्या स्थितीमुळे केंद्र व राज्य शासनाकडून लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीच्या कालावधीत सार्वजनिक/सामुदायिक शौचालयांच्या (CT/PT) ०५ वर्षाच्या ठेका कालावधीमध्ये बाह्य भिंतींची सुबक रंगरंगोटी करणे, शौचालयांचे भींतींवर लावण्यात येणाऱ्या जाहिरात माध्यमांचा तसेच त्यासभोवतीच्या परिसराचे सुशोभिकरण करणे, देखभाल व निगा राखणे व त्यापोटी सार्वजनिक /सामुदायिक शौचालयांच्या (CT/PT) भिंतींवर जाहिरात करणेबाबतच्या ठेक्यांतर्गत ठेका कालावधी वाढवून देण्याबाबत प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक/सामुदायिक शौचालयांच्या (CT/PT) ०५ वर्षाच्या ठेका कालावधीमध्ये बाह्य भिंतींची सुबक रंगरंगोटी करणे, शौचालयांचे भींतींवर लावण्यात येणाऱ्या जाहिरात माध्यमांचा तसेच त्यासभोवतीच्या परिसराचे सुशोभिकरण करणे, देखभाल व निगा राखणे व त्यापोटी सार्वजनिक/सामुदायिक शौचालयांच्या (CT/PT) भिंतींवर जाहिरात करणेबाबतचे हक्क देणेबाबतचा ठेका ०५ वर्षाच्या कालावधीकरीता देण्यात आलेला आहे.<br>कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे दिनांक २२/०३/२०२० पासून केंद्र आणि राज्य शासनाने टाळेबंदी जाहिर केल्यामुळे, अत्यावश्यक सेवा वगळून इतर नियमित कामकाजावर परिणाम होवून जाहिरात व्यवसायसह सर्व सार्वजनिक/खाजगी संस्थेचे कामकाज ठप्प झाले. त्या अनुषंगाने टाळेबंदी कालावधी दरम्यान उक्त नमूद ठेक्यांतर्गत प्रदान करावयाच्या ठेका रक्कमेत सूट अथवा ठेका कालावधीस मुदत वाढ मिळण्याकरिता सदर कामाच्या ठेकेदारानी पत्राद्वारे विनंती केली होती.<br>कोविड-१९ महामारीच्या परिस्थितीमुळे MSRDC,Railway Board, BEST, NMMT इत्यादी प्राधिकरणांदेखील त्यांचेकडील जाहिरात निविदेतील ठेकेदारांना जाहिरात प्रदर्शित करण्याबाबचे भाडे रक्कम भरणा करण्याच्या रक्कमेमध्ये सवलत/सूट देण्यास व ठेका कालावधी वाढवून देण्यास मंजूरी दिलेली आहे.<br>महापालिकेच्या मालमत्तांवर उभारण्यात आलेल्या जाहिरात फलकावरील जाहिराती या जनतेच्या दैनंदिन वापरातील वस्तू, सौदर्य प्रसाधने, इलेक्ट्रीक साधन,नवीन घर अशा प्रकारच्या असतात. कोविड-१९ च्या कालावधीत कोरोना वायरसचा प्रसार रोखण्यासाठी शासनाकडून टाळेबंदी लागू करण्यात आली. त्यामुळे काही कालावधीकरीता सर्व कार्यालये,कारखाने,दुकाने हे बंद ठेवण्यात आलेले होते. त्यामुळे रस्त्यावरील सामान्य जनतेची वर्दळ पुर्णपणे बंद झाल्यामुळे व ग्राहकांकडून मागणी पुर्णपणे बंद झाल्यामुळे उत्पादकांकडून ठेकेदारास देण्यात येणाऱ्या जाहिराती रद्द करण्यात आल्याने संपूर्ण कामकाज बंद असल्याने ठेकेदारास कसलेही उत्पन्न प्राप्त होत नसल्याने त्यांनी निविदेतील ठेका रक्कम भरणा करण्यास सूट/सवलत अथवा ठेका कालावधीमध्ये मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केली आहे.<br>कोविड-१९ मुळे बाजारात मंदी असल्याने उत्पादन व विक्री करण्यास बंधने होती. या सर्व बाबींमुळे बाजारात मंदीसदृष्य परिस्थिती निर्माण झालेली होती. निविदेतील ठेकेदारास भाडे रक्कमेत सूट देण्याऐवजी कंत्राटाचे सातत्य टिकवून ठेवण्याचा महापालिकेचा उद्देश साध्य करुन कंत्राटदारास निविदेकरिता यापुर्वी देण्यात आलेल्या ०५ वर्षाच्या कालावधीमध्ये ०१ (एक) वर्षाकरिता वाढ देवून आणि महापालिकेचा महसूल सुरु राहण्याच्या दृष्टीने तसेच सद्याची व्यापर उद्योगाची स्थिती, आर्थिक मंदी व MSRDC, Railway Board, BEST, NMMT,इ. प्राधिकरणांनी दिलेल्या सवलत विचारात घेता काही अटी व शर्तीच्या अधिन राहून निविदेच्या अंतिम वर्षाच्या (०५ वे वर्षे) ठेका रक्कमेत २० टक्के वाढ करुन येणाऱ्या रक्कमेत ०१ (एक) वर्षाचा कालावधी वाढवून देण्यास प्रस्तावित करण्यात आली आहे.<br>उपरोक्त प्रस्ताव स्विकारल्यानंतर सदर ठेकेदारास निविदा समाप्त करता येणार नाही. तसेच ठेकेदरास वाढीव कालावधीमध्ये वाढीव ठेका रक्कम अधिक सदर ठेक्यांतर्गत उभारण्यात आलेल्या व येणाऱ्या जाहिरात फलकांकरिता महापालिकेने मंजूर केलेले अथवा भविष्यात मंजूर होणाऱ्या दरांनी जाहिरात शुल्क अदा करणे बंधनकारक राहिल याबाबत संबंधित निविदाकाराकडून महापालिकेस आश्वासित करण्याकरीता रु.५००/- च्या मुद्रांकान्वये नोटराईज हमीपत्र सादर करणे अनिवार्य असेल, तथापि वरील प्रस्ताव स्विकारल्यानंतर जर ठेकेदराने ठेक्यातून माघार घेतली तर उपरोक्त सूट त्वरीत काढून घेण्यात येईल. आणि सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. सदरचा कोविड-१९ महामारीमुळे निविदेकरिता यापुर्वी देण्यात आलेल्या ०५ वर्षाच्या कालावधीमध्ये ०१ (एक) वर्षाची वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) नुसार मा.आयुक्त तथा मा. प्रशासक यांची प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात यावी." |

| | |
|---|---|
| निर्णय : | ठराव करण्यात येतो की,<br>कोविड-१९ या महामारीच्या स्थितीमुळे केंद्र व राज्य शासनाकडून लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीच्या कालावधीत सार्वजनिक/सामुदायिक शौचालयांच्या (CT/PT) ०५ वर्षाच्या ठेका कालावधीमध्ये बाह्य भिंतींची सुबक रंगरंगोटी करणे, शौचालयांचे भींतींवर लावण्यात येणाऱ्या जाहिरात माध्यमांचा तसेच त्यासभोवतीच्या परिसराचे सुशोभिकरण करणे, देखभाल व निगा राखणे व त्यापोटी सार्वजनिक /सामुदायिक शौचालयांच्या (CT/PT) भिंतींवर जाहिरात करणेबाबतच्या ठेक्यांतर्गत ठेका कालावधी वाढवून देण्याबाबत प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ०२ ठराव क्रमांक २६३५ अन्वये, प्रस्तावित केल्याप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक/सामुदायिक शौचालयांच्या (CT/PT) ०५ वर्षांच्या ठेका कालावधीमध्ये बाह्य भिंतींची सुबक रंगरंगोटी करणे, शौचालयांचे भींतींवर लावण्यात येणाऱ्या जाहिरात माध्यमांचा तसेच त्यासभोवतीच्या परिसराचे सुशोभिकरण करणे, देखभाल व निगा राखणे व त्यापोटी सार्वजनिक/सामुदायिक शौचालयांच्या (CT/PT) भिंतींवर जाहिरात करणेबाबतचे हक्क देणेबाबतचा ठेका ०५ वर्षाच्या कालावधीकरीता देण्यात आलेला आहे.<br>कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे दिनांक २२/०३/२०२० पासून केंद्र आणि राज्य शासनाने टाळेबंदी जाहिर केल्यामुळे, अत्यावश्यक सेवा वगळून इतर नियमित कामकाजावर परिणाम होवून जाहिरात व्यवसायसह सर्व सार्वजनिक/खाजगी संस्थेचे कामकाज ठप्प झाले. त्या अनुषंगाने टाळेबंदी कालावधी दरम्यान उक्त नमूद ठेक्यांतर्गत प्रदान करावयाच्या ठेका रक्कमेत सूट अथवा ठेका कालावधीस मुदत वाढ मिळण्याकरिता सदर कामाच्या ठेकेदारानी पत्राद्वारे विनंती केली होती.<br>कोविड-१९ महामारीच्या परिस्थितीमुळे MSRDC,Railway Board, BEST, NMMT इत्यादी प्राधिकरणांदेखील त्यांचेकडील जाहिरात निविदेतील ठेकेदारांना जाहिरात प्रदर्शित करण्याबाबचे भाडे रक्कम भरणा करण्याच्या रक्कमेमध्ये सवलत/सूट देण्यास व ठेका कालावधी वाढवून देण्यास मंजूरी दिलेली आहे.<br>महापालिकेच्या मालमत्तांवर उभारण्यात आलेल्या जाहिरात फलकावरील जाहिराती या जनतेच्या दैनंदिन वापरातील वस्तू, सौदर्य प्रसाधने,इलेक्ट्रीक साधन,नवीन घर अशा प्रकारच्या असतात. कोविड-१९ च्या कालावधीत कोरोना वायरसचा प्रसार रोखण्यासाठी शासनाकडून टाळेबंदी लागू करण्यात आली. त्यामुळे काही कालावधीकरीता सर्व कार्यालये,कारखाने,दुकाने हे बंद ठेवण्यात आलेले होते. त्यामुळे रस्त्यावरील सामान्य जनतेची वर्दळ पुर्णपणे बंद झाल्यामुळे व ग्राहकांकडून मागणी पुर्णपणे बंद झाल्यामुळे उत्पादकांकडून ठेकेदारास देण्यात येणाऱ्या जाहिराती रद्द करण्यात आल्याने संपूर्ण कामकाज बंद असल्याने ठेकेदारास कसलेही उत्पन्न प्राप्त होत नसल्याने त्यांनी निविदेतील ठेका रक्कम भरणा करण्यास सूट/सवलत अथवा ठेका कालावधीमध्ये मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केली आहे.<br>कोविड-१९ मुळे बाजारात मंदी असल्याने उत्पादन व विक्री करण्यास बंधने होती. या सर्व बाबींमुळे बाजारात मंदीसदृष्य परिस्थिती निर्माण झालेली होती. निविदेतील ठेकेदारास भाडे रक्कमेत सूट देण्याऐवजी कंत्राटाचे सातत्य टिकवून ठेवण्याचा महापालिकेचा उद्देश साध्य करुन कंत्राटदारास निविदेकरिता यापुर्वी देण्यात आलेल्या ०५ वर्षाच्या कालावधीमध्ये ०१ (एक) वर्षाकरिता वाढ देवून आणि महापालिकेचा महसूल सुरु राहण्याच्या दृष्टीने तसेच सद्याची व्यापर उद्योगाची स्थिती, आर्थिक मंदी व MSRDC, Railway Board, BEST, NMMT,इ. प्राधिकरणांनी दिलेल्या सवलत विचारात घेता काही अटी व शर्तीच्या अधिन राहून निविदेच्या अंतिम वर्षाच्या (०५ वे वर्षे) ठेका रक्कमेत २० टक्के वाढ करुन येणाऱ्या रक्कमेत ०१ (एक) वर्षाचा कालावधी वाढवून देण्यास प्रस्तावित करण्यात आली आहे.<br>उपरोक्त प्रस्ताव स्विकारल्यानंतर सदर ठेकेदारास निविदा समाप्त करता येणार नाही. तसेच ठेकेदरास वाढीव कालावधीमध्ये वाढीव ठेका रक्कम अधिक सदर ठेक्यांतर्गत उभारण्यात आलेल्या व येणाऱ्या जाहिरात फलकांकरिता महापालिकेने मंजूर केलेले अथवा भविष्यात मंजूर होणाऱ्या दरांनी जाहिरात शुल्क अदा करणे बंधनकारक राहिल याबाबत संबंधित निविदाकाराकडून महापालिकेस आश्वासित करण्याकरीता रु.५००/- च्या मुद्रांकान्वये नोटराईज हमीपत्र सादर करणे अनिवार्य असेल, तथापि वरील प्रस्ताव स्विकारल्यानंतर जर ठेकेदराने ठेक्यातून माघार घेतली तर उपरोक्त सूट त्वरीत काढून घेण्यात येईल. आणि सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. सदरचा कोविड-१९ महामारीमुळे निविदेकरिता यापुर्वी देण्यात आलेल्या ०५ वर्षाच्या कालावधीमध्ये ०१ (एक) वर्षाची वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) नुसार मा.आयुक्त तथा मा. प्रशासक यांची प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे. |

सही/-
(चित्रा बाविस्कर)
नगरसचिव
नवी मुंबई महानगरपालिका

सही/-
(अभिजीत बांगर)
आयुक्त तथा प्रशासक
नवी मुंबई महानगरपालिका

<table>
<tr><td>विषय क्र. ०३.<br>दि.०४ ऑगस्ट, २०२२.</td><td>कोविड-१९ या महामारीच्या स्थितीमुळे केंद्र व राज्य शासनाकडून लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीच्या कालावधीत नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्तांवर युनिपोल होर्डींग, गॅन्ट्री, पोल किऑक्स, स्ट्रीट फर्निचर उभारणे परिसराचे सुशोभिकरण करणे, निगा व देखभाल दुरुस्ती करणे यासाठी ०७ वर्षे कालावधीसाठी खाजगी सार्वजनिक सहभाग (Public Private Partnership) तत्वावर जाहिरातीचे हक्क देऊन विकसित करणेबाबतच्या ठेक्यांतर्गत प्रदान करावयाच्या ठेका रक्कमेत सुट देण्याबाबत प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत, आयुक्तांचे दिनांक ०४/०८/२०२२, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/परवाना विभाग/जाहिरात माध्यमे/५३२/२०२२.</td></tr>
<tr><td>ठराव क्रमांक<br>२६३६</td><td>"उपरोक्त संदर्भात कोविड-१९ या महामारीच्या स्थितीमुळे केंद्र व राज्य शासनाकडून लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीच्या कालावधीत नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्तांवर युनिपोल होर्डींग, गॅन्ट्री, पोल किऑक्स, स्ट्रीट फर्निचर उभारणे परिसराचे सुशोभिकरण करणे, निगा व देखभाल दुरुस्ती करणे यासाठी ०७ वर्षे कालावधीसाठी खाजगी सार्वजनिक सहभाग (Public Private Partnership) तत्वावर जाहिरातीचे हक्क देऊन विकसित करणेबाबतच्या ठेक्यांतर्गत प्रदान करावयाच्या ठेका रक्कमेत सुट देण्याबाबत प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्तांवर युनिपोल होर्डींग, गॅन्ट्री,पोल किऑक्स,स्ट्रीट फर्निचर उभारणे परिसराचे सुशोभिकरण करणे, निगा व देखभाल दुरुस्ती करणे यासाठी ०७ वर्षे कालावधीसाठी खाजगी सार्वजनिक सहभाग (Public Private Partnership) तत्वावर जाहिरातीचे हक्क देऊन विकसित करणेबाबतचा ठेका देण्यात आलेला आहे.<br>कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे दिनांक २२/०३/२०२० पासून केंद्र आणि राज्य शासनाने टाळेबंदी जाहिर केल्यामुळे, अत्यावश्यक सेवा वगळून इतर नियमीत कामकाजावर परिणाम होवून जाहिरात व्यवसायासह सर्व सार्वजनिक/खाजगी संस्थेचे कामकाज ठप्प झाले. त्या अनुषंगाने टाळेबंदी कालावधी दरम्यान उक्त नमूद ठेक्यांतर्गत प्रदान करावयाच्या ठेका रक्कमेत सूट अथवा ठेका कालावधीस मुदत वाढ मिळण्याकरिता सदर कामाच्या ठेकेदारानी पत्राद्वारे विनंती केली होती.<br>कोविड-१९ महामारीच्या परिस्थितीमुळे MSRDC,Railway Board, BEST, NMMT इत्यादी प्राधिकरणांदेखील त्यांचेकडील जाहिरात निविदेतील ठेकेदारांना जाहिरात प्रदर्शित करण्याबाबचे भाडे रक्कम भरणा करण्याच्या रक्कमेमध्ये सवलत/सूट देण्यास मंजूरी दिलेली आहे.<br>महापालिकेच्या मालमत्तांवर उभारण्यात आलेल्या जाहिरात फलकावरील जाहिराती या जनतेच्या दैनंदिन वापरातील वस्तू, सौदर्य प्रसाधने,इलेक्ट्रीक साधन,नवीन घर अशा प्रकारच्या असतात. कोविड-१९ च्या कालावधीत कोरोना वायरसचा प्रसार रोखण्यासाठी शासनाकडून टाळेबंदी लागू करण्यात आली. त्यामुळे काही कालावधीकरीता सर्व कार्यालये,कारखाने,दुकान हे बंद ठेवण्यात आलेले होते. त्यामुळे रस्त्यावरील सामान्य जनतेची वर्दळ पुर्णपणे बंद झाल्यामुळे व ग्राहकांकडून मागणी पुर्णपणे बंद झाल्यामुळे उत्पादकांकडून ठेकेदारास देण्यात येणाऱ्या जाहिराती रद्द करण्यात आल्याने संपूर्ण कामकाज बंद असल्याने ठेकेदारास कसलेही उत्पन्न प्राप्त होत नसल्याने त्यांनी निविदेतील ठेका रक्कम भरणा करण्यास सूट/सवलत अथवा ठेका कालावधीमध्ये मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केली आहे. कोविड-१९ मुळे बाजारात मंदी असल्याने उत्पादन व विक्री करण्यास बंधने होती. या सर्व बाबींमुळे बाजारात मंदीसदृष्य परिस्थिती निर्माण झालेली होती. निविदेतील ठेकेदारास भाडे रक्कमेत सूट देण्याबाबत तसेच कंत्राटाचे सातत्य टिकवून ठेवण्याचा महापालिकेचा उद्देश साध्य करुन कंत्राटदारास ठेका रक्कमेत सूट देवून आणि महापालिकेचा महसूल सुरु राहण्याच्या दृष्टीने तसेच सद्याची व्यापार उद्योगाची स्थिती, आर्थिक मंदी व MSRDC,Railway Board, BEST, NMMT,इ. प्राधिकरणांनी दिलेली सवलत विचारात घेता काही अटी व शर्तीच्या अधिन राहून पुढील प्रमाणे सूट प्रस्तावित करण्यात आली आहे.<br>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>कालावधी</th><th>ठेका रक्कमेत द्यावयाची सूट</th></tr>
<tr><td>१</td><td>एप्रिल २०२० ते जून २०२०</td><td>९० टक्के</td></tr>
<tr><td>२</td><td>जुलै २०२० ते सप्टेंबर २०२०</td><td>८० टक्के</td></tr>
<tr><td>३</td><td>ऑक्टोंबर २०२० ते डिसेंबर २०२०</td><td>५० टक्के</td></tr>
<tr><td>४</td><td>जानेवारी २०२१ ते मार्च २०२१</td><td>२५ टक्के</td></tr>
<tr><td>५</td><td>एप्रिल २०२१ ते मे २०२१</td><td>९० टक्के</td></tr>
<tr><td>६</td><td>जून २०२१ ते जुलै २०२१</td><td>५० टक्के</td></tr>
</table>
उपरोक्त प्रस्ताव स्विकारल्यानंतर सदर ठेकेदारास निविदा समाप्त करता येणार नाही. याबाबत संबंधित निविदाकाराकडून महापालिकेस आश्वासित करण्याकरीता रु.५००/- च्या मुद्रांकान्वये नोटराईज हमीपत्र सादर करणे अनिवार्य असेल, तथापि वरील प्रस्ताव स्विकारल्यानंतर जर ठेकेदराने ठेक्यातून माघार घेतली तर उपरोक्त सूट त्वरीत काढून घेण्यात येईल. आणि सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. सदरचा कोविड-१९ कालावधीतील सदर ठेक्याच्या ठेका रक्कमेत सुटबाबतचा प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) नुसार मा.आयुक्त तथा मा.प्रशासक यांची प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात यावी."</td></tr>
</table>

निर्णय :

ठराव करण्यात येतो की,

कोविड-१९ या महामारीच्या स्थितीमुळे केंद्र व राज्य शासनाकडून लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीच्या कालावधीत नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्तांवर युनिपोल होर्डींग, गॅन्ट्री, पोल किऑक्स, स्ट्रीट फर्निचर उभारणे परिसराचे सुशोभिकरण करणे, निगा व देखभाल दुरुस्ती करणे यासाठी ०७ वर्षे कालावधीसाठी खाजगी सार्वजनिक सहभाग (Public Private Partnership) तत्वावर जाहिरातीचे हक्क देऊन विकसित करणेबाबतच्या ठेक्यांतर्गत प्रदान करावयाच्या ठेका रक्कमेत सुट देण्याबाबत प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.

त्यानुसार विषय क्रमांक ०३ ठराव क्रमांक २६३६ अन्वये, प्रस्तावित केल्याप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्तांवर युनिपोल होर्डींग, गॅन्ट्री,पोल किऑक्स,स्ट्रीट फर्निचर उभारणे परिसराचे सुशोभिकरण करणे, निगा व देखभाल दुरुस्ती करणे यासाठी ०७ वर्षे कालावधीसाठी खाजगी सार्वजनिक सहभाग (Public Private Partnership) तत्वावर जाहिरातीचे हक्क देऊन विकसित करणेबाबतचा ठेका देण्यात आलेला आहे.

कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे दिनांक २२/०३/२०२० पासून केंद्र आणि राज्य शासनाने टाळेबंदी जाहिर केल्यामुळे, अत्यावश्यक सेवा वगळून इतर नियमीत कामकाजावर परिणाम होवून जाहिरात व्यवसायासह सर्व सार्वजनिक/खाजगी संस्थेचे कामकाज ठप्प झाले. त्या अनुषंगाने टाळेबंदी कालावधी दरम्यान उक्त नमूद ठेक्यांतर्गत प्रदान करावयाच्या ठेका रक्कमेत सूट अथवा ठेका कालावधीस मुदत वाढ मिळण्याकरिता सदर कामाच्या ठेकेदारानी पत्राद्वारे विनंती केली होती.

कोविड-१९ महामारीच्या परिस्थितीमुळे MSRDC,Railway Board, BEST, NMMT इत्यादी प्राधिकरणांदेखील त्यांचेकडील जाहिरात निविदेतील ठेकेदारांना जाहिरात प्रदर्शित करण्याबाबचे भाडे रक्कम भरणा करण्याच्या रक्कमेमध्ये सवलत/सूट देण्यास मंजूरी दिलेली आहे.

महापालिकेच्या मालमत्तांवर उभारण्यात आलेल्या जाहिरात फलकावरील जाहिराती या जनतेच्या दैनंदिन वापरातील वस्तू, सौदर्य प्रसाधने,इलेक्ट्रीक साधन,नवीन घर अशा प्रकारच्या असतात. कोविड-१९ च्या कालावधीत कोरोना वायरसचा प्रसार रोखण्यासाठी शासनाकडून टाळेबंदी लागू करण्यात आली. त्यामुळे काही कालावधीकरीता सर्व कार्यालये,कारखाने,दुकान हे बंद ठेवण्यात आलेले होते. त्यामुळे रस्त्यावरील सामान्य जनतेची वर्दळ पुर्णपणे बंद झाल्यामुळे व ग्राहकांकडून मागणी पुर्णपणे बंद झाल्यामुळे उत्पादकांकडून ठेकेदरास देण्यात येणाऱ्या जाहिराती रद्द करण्यात आल्याने संपूर्ण कामकाज बंद असल्याने ठेकेदारास कसलेही उत्पन्न प्राप्त होत नसल्याने त्यांनी निविदेतील ठेका रक्कम भरणा करण्यास सूट/सवलत अथवा ठेका कालावधीमध्ये मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केली आहे. कोविड-१९ मुळे बाजारात मंदी असल्याने उत्पादन व विक्री करण्यास बंधने होती. या सर्व बाबींमुळे बाजारात मंदीसदृष्य परिस्थिती निर्माण झालेली होती. निविदेतील ठेकेदारास भाडे रक्कमेत सूट देण्याबाबत तसेच कंत्राटाचे सातत्य टिकवून ठेवण्याचा महापालिकेचा उद्देश साध्य करुन कंत्राटदारास ठेका रक्कमेत सूट देवून आणि महापालिकेचा महसूल सुरु राहण्याच्या दृष्टीने तसेच सद्याची व्यापार उद्योगाची स्थिती, आर्थिक मंदी व MSRDC,Railway Board, BEST, NMMT,इ. प्राधिकरणांनी दिलेली सवलत विचारात घेता काही अटी व शर्तीच्या अधिन राहून पुढील प्रमाणे सूट प्रस्तावित करण्यात आली आहे.

| अ.क्र. | कालावधी | ठेका रक्कमेत द्यावयाची सूट |
|---|---|---|
| १ | एप्रिल २०२० ते जून २०२० | ९० टक्के |
| २ | जुलै २०२० ते सप्टेंबर २०२० | ८० टक्के |
| ३ | ऑक्टोंबर २०२० ते डिसेंबर २०२० | ५० टक्के |
| ४ | जानेवारी २०२१ ते मार्च २०२१ | २५ टक्के |
| ५ | एप्रिल २०२१ ते मे २०२१ | ९० टक्के |
| ६ | जून २०२१ ते जुलै २०२१ | ५० टक्के |

उपरोक्त प्रस्ताव स्विकारल्यानंतर सदर ठेकेदारास निविदा समाप्त करता येणार नाही. याबाबत संबंधित निविदाकाराकडून महापालिकेस आश्वासित करण्याकरीता रु.५००/- च्या मुद्रांकान्वये नोटराईज हमीपत्र सादर करणे अनिवार्य असेल, तथापि वरील प्रस्ताव स्विकारल्यानंतर जर ठेकेदराने ठेक्यातून माघार घेतली तर उपरोक्त सूट त्वरीत काढून घेण्यात येईल. आणि सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. सदरचा कोविड-१९ कालावधीतील सदर ठेक्याच्या ठेका रक्कमेत सुटबाबतचा प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) नुसार मा.आयुक्त तथा मा.प्रशासक यांची प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे.

सही/-
(चित्रा बाविस्कर)
नगरसचिव
नवी मुंबई महानगरपालिका

सही/-
(अभिजीत बांगर)
आयुक्त तथा प्रशासक
नवी मुंबई महानगरपालिका

| | |
|---|---|
| विषय क्र. ०४.<br>दि.०४ ऑगस्ट, २०२२. | **सन २०११ च्या महाराष्ट्र अध्यादेशानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ७३(ड) च्या आवश्यकतेनुसार रुपये पाच लक्ष पेक्षा जास्त परंतु रुपये पंचविस लक्षापेक्षा कमी खर्चाच्या कामासंबंधी केलेल्या कराराबाबतचा अहवाल, आयुक्तांचे दिनांक ०४/०८/२०२२, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/उद्यान /१०२७/२०२२.** |
| ठराव क्रमांक<br>२६३७ | "उपरोक्त संदर्भात सन २०११ च्या महाराष्ट्र अध्यादेशानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ७३(ड) च्या आवश्यकतेनुसार रुपये पाच लक्ष पेक्षा जास्त परंतु रुपये पंचविस लक्षापेक्षा कमी खर्चाच्या कामासंबंधी केलेल्या कराराबाबतचा अहवाल, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा. प्रशासक यांचे माहितीस्तव सादर करण्यात यावे." |
| निर्णय : | ठराव करण्यात येतो की,<br>सन २०११ च्या महाराष्ट्र अध्यादेशानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ७३(ड) च्या आवश्यकतेनुसार रुपये पाच लक्ष पेक्षा जास्त परंतु रुपये पंचविस लक्षापेक्षा कमी खर्चाच्या कामासंबंधी केलेल्या कराराबाबतचा अहवाल, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ०४ ठराव क्रमांक २६३७ अन्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह केलेल्या कामांची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा. प्रशासक यांचे माहितीकरीता सादर करण्यात येत आहे. |

सही/-
(चित्रा बाविस्कर)
नगरसचिव
नवी मुंबई महानगरपालिका

सही/-
(अभिजीत बांगर)
आयुक्त तथा प्रशासक
नवी मुंबई महानगरपालिका

| | |
|---|---|
| विषय क्र. ०५.<br>दि.०४ ऑगस्ट, २०२२. | **नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभागात करार पध्दतीने (कंत्राटी) निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात विशेषज्ञ वैदयकिय सल्लागार अधिकारी (दंतशल्यचिकित्सक तज्ञ) यांच्या नेमणूकीबाबत, आयुक्तांचे दिनांक ०४/०८/२०२२, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/आरोग्य /८१६५/२०२२.** |
| ठराव क्रमांक<br>२६३८ | "उपरोक्त संदर्भात नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभागात करार पध्दतीने (कंत्राटी) निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात विशेषज्ञ वैदयकिय सल्लागार अधिकारी (दंतशल्यचिकित्सक तज्ञ) यांच्या नेमणूकीबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये आरोग्य विभागाअंतर्गत ३ सार्वजनिक रुग्णालये, ३ माता बाल रुग्णालये व २३ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र यांचेमार्फत आरोग्य सेवा नागरीकांना उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.<br><br>नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत सार्वजनिक रुग्णालय, वाशी या रुग्णालयात नमुंमपा कार्यक्षेत्रातासहित पनवेल, उरण, मानखुर्द असे नमुंमपा कार्यक्षेत्राबाहेरील, सर्व प्रकारचे रुग्ण मोठया प्रमाणावर उपचारार्थ येत असतात. त्याचप्रमाणे सार्वजनिक रुग्णालय, नेरुळ व ऐरोली पुर्ण कार्यक्षमतेने १० आय.सी.यु. बेड चे कक्ष कार्यान्वित करण्यात आलेले आहे तसेच माता बाल रुग्णालय, तुर्भे हे सुध्दा सुरु करण्यात आलेले असुन रुग्णांना सेवा देणे सुरु झाले आहे.<br>वरील रुग्णालयामधून वैदयकशास्त्र, प्रसुती व स्त्रीरोग, नवजात शिशु, बालरोग, त्वचारोग, क्षयरोग मानसोपचार, भौतिकोपचार, नेत्रचिकित्सा, अस्थिव्यंग, कान नाक घसा चिकित्सा, अतिदक्षता विभाग, हदयरोग विभाग, शरीर विकृतीशास्त्र विभाग, क्ष-किरण विभाग कार्यान्वीत आहेत. उपलब्ध सुविधा या नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील व कार्यक्षेत्राबाहेरील रुग्ण सदर सेवेचा लाभ घेत आहेत.<br>वरील प्रमाणे रुग्णालयात रुग्णांना सेवा देण्यासाठी उपलब्ध असलेल्या विभागाकरिता तज्ञ वैदयकिय अधिकारी यांची कमतरता भासत असुन पुर्ण क्षमतेने रुग्णालय सुरु करण्यासाठी तज्ञ वैदयकिय अधिका-यांची नितांत आवश्यकता आहे.<br>अधिनियमातील तरतूद :-<br>महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम<br>१) ५३ (१) अन्वये महानगरपालिकेच्या ज्या अधिका-यांचे किमान मासिक भत्ते वगळून चारशे रुपये किंवा त्याहून अधिक आहे — मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेकडे निहित असेल ;<br>परंतु, आयुक्ताला भत्ते वगळून चारशे रुपये किंवा त्याहुन अधिक मासिक वेतन असलेल्या कर्जाविषयक कामांसाठी करावाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्वमंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्याविषयी महनगरपालिकेस पुर्वमंजुरीवाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.<br>तज्ञ वैदयकिय अधिकारी यांना रुग्णालयाच्या आवश्यकतेनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सहा महिन्याच्या कालावधी करीता नियुक्ती आदेश देण्यात येत असतात.<br>रुग्णालयातील दंतशल्यचिकित्सक पदाचे एकूण ०९ पदे मंजूर असून कायम २ पदे भरलेली व करारवरील ५ दंतशल्यचिकित्सक कार्यरत असून करारवरील पदे वगळता रिक्त् पदे ०७ आहेत.<br>डॉ. साई नंदकुमार चव्हाण, यांनी दंतशल्यचिकित्सक या पदावर नियुक्ती मिळणेबाबत अर्ज सादर केला आहे.<br><br>अ.क्र \| तज्ञ वैदयकिय अधिकारी नाव व पदनाम \| रुग्णालयाचे नाव \| मासिक ठोकमानधन रुपये/ वेतनश्रेणी<br>१ \| डॉ. साई नंदकुमार चव्हाण \| सार्वजनिक रुग्णालय, वाशी \| १५६००-३९१०० ग्रेडवेतन ५४००/-<br><br>नवी मुंबई महानगरपालिकेची विद्यमान मुदत दि.०७/०५/२०२० रोजी संपुष्टात येऊन महानगरपालिकेच्या प्रशासक पदाचा कार्यभार मा. आयुक्त यांनी स्विकारला आहे.<br>तरी उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित केलेल्या एकूण — ०१ तज्ञ वैदयकिय अधिकारी (दंतशल्यचिकित्सक) यांना १५०००-३९१०० ग्रेड वेतन ५४००/- वर, तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीवर प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, मधील कलम ५३ (१) अन्वये नव्याने सार्वजनिक रुग्णालय, वाशी येथे नव्याने नियुक्ती देण्याकरीता मा.आयुक्त तथा मा. प्रशासक, यांची मान्यता देण्यात यावी." |

| | |
|---|---|
| निर्णय : | ठराव करण्यात येतो की,<br>नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभागात करार पध्दतीने (कंत्राटी) निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात विशेषज्ञ वैदयकिय सल्लागार अधिकारी (दंतशल्यचिकित्सक तज्ञ) यांच्या नेमणूकीबाबत, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ०५ ठराव क्रमांक २६३८ अन्वये, प्रस्तावित केल्याप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये आरोग्य विभागाअंतर्गत ३ सार्वजनिक रुग्णालये, ३ माता बाल रुग्णालये व २३ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र यांचेमार्फत आरोग्य सेवा नागरीकांना उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.<br>नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत सार्वजनिक रुग्णालय, वाशी या रुग्णालयात नमुंमपा कार्यक्षेत्रातासहित पनवेल, उरण, मानखुर्द असे नमुंमपा कार्यक्षेत्राबाहेरील, सर्व प्रकारचे रुग्ण मोठया प्रमाणावर उपचारार्थ येत असतात. त्याचप्रमाणे सार्वजनिक रुग्णालय, नेरुळ व ऐरोली पुर्ण कार्यक्षमतेने १० आय.सी.यु. बेड चे कक्ष कार्यान्वित करण्यात आलेले आहे तसेच माता बाल रुग्णालय, तुर्भे हे सुध्दा सुरु करण्यात आलेले असुन रुग्णांना सेवा देणे सुरु झाले आहे.<br>वरील रुग्णालयामधून वैदयकशास्त्र, प्रसुती व स्त्रीरोग, नवजात शिशु, बालरोग, त्वचारोग, क्षयरोग मानसोपचार, भौतिकोपचार, नेत्रचिकित्सा, अस्थिव्यंग, कान नाक घसा चिकित्सा, अतिदक्षता विभाग, हदयरोग विभाग, शरीर विकृतीशास्त्र विभाग, क्ष-किरण विभाग कार्यान्वीत आहेत. उपलब्ध सुविधा या नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील व कार्यक्षेत्राबाहेरील रुग्ण सदर सेवेचा लाभ घेत आहेत.<br>वरील प्रमाणे रुग्णालयात रुग्णांना सेवा देण्यासाठी उपलब्ध असलेल्या विभागाकरिता तज्ञ वैदयकिय अधिकारी यांची कमतरता भासत असुन पुर्ण क्षमतेने रुग्णालय सुरु करण्यासाठी तज्ञ वैदयकिय अधिका-यांची नितांत आवश्यकता आहे.<br>अधिनियमातील तरतूद :-<br>महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम<br>१) ५३ (१) अन्वये महानगरपालिकेच्या ज्या अधिका-यांचे किमान मासिक भत्ते वगळून चारशे रुपये किंवा त्याहून अधिक आहे — मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेकडे निहित असेल ;<br>परंतु, आयुक्ताला भत्ते वगळून चारशे रुपये किंवा त्याहुन अधिक मासिक वेतन असलेल्या कर्जाविषयक कामांसाठी करावाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्वमंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्याविषयी महनगरपालिकेस पुर्वमंजुरीवाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.<br>तज्ञ वैदयकिय अधिकारी यांना रुग्णालयाच्या आवश्यकतेनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सहा महिन्याच्या कालावधी करीता नियुक्ती आदेश देण्यात येत असतात.<br>रुग्णालयातील दंतशल्य्चिकित्सक पदाचे एकूण ०९ पदे मंजूर असून कायम २ पदे भरलेली व करारवरील ५ दंतशल्य्चिकित्सक कार्यरत असून करारवरील पदे वगळता रिक्त् पदे ०७ आहेत.<br>डॉ. साई नंदकुमार चव्हाण, यांनी दंतशल्य्चिकित्सक या पदावर नियुक्ती मिळणेबाबत अर्ज सादर केला आहे. |

| अ.क्र | तज्ञ वैदयकिय अधिकारी नाव व पदनाम | रुग्णालयाचे नाव | मासिक ठोकमानधन रुपये/ वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | डॉ. साई नंदकुमार चव्हाण | सार्वजनिक रुग्णालय, वाशी | १५६००-३९१०० ग्रेडवेतन ५४००/- |

नवी मुंबई महानगरपालिकेची विद्यमान मुदत दि.०७/०५/२०२० रोजी संपुष्टात येऊन महानगरपालिकेच्या प्रशासक पदाचा कार्यभार मा. आयुक्त यांनी स्विकारला आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित केलेल्या एकूण — ०१ तज्ञ वैदयकिय अधिकारी (दंतशल्य्चिकित्सक) यांना १५०००-३९१०० ग्रेड वेतन ५४००/- वर, तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीवर प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, मधील कलम ५३ (१) अन्वये नव्याने सार्वजनिक रुग्णालय, वाशी येथे नव्याने नियुक्ती देण्याकरीता मा.आयुक्त तथा मा. प्रशासक, यांची मान्यता देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| सही/-<br>(चित्रा बाविस्कर)<br>नगरसचिव<br>नवी मुंबई महानगरपालिका | सही/-<br>(अभिजीत बांगर)<br>आयुक्त तथा प्रशासक<br>नवी मुंबई महानगरपालिका |